# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

आडगाव, नाशिक-पिन ४२२००३, दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०

**E.Mail- pilcbnskr@gmail.com**


---

## प्रेसनोट

दिनांकः- १०/०४/२०१८

## नाशिक ग्रामीण पोलीस भरती सन २०१८ - पोलीस शिपाई पदाचे भरती प्रक्रिये बाबत पोलीस होण्यासाठी प्रशासनाची फसवणुक - लेखी परिक्षेत तोतया उमेदवार

---

नाशिक ग्रामीण पोलीस शिपाई भरती सन २०१८ ची लेखी परीक्षा आज दिनांक १०/०४/२०१८ रोजी पोलीस कवायत मैदान आडगाव येथे सकाळी ०७:०० ते ०८:३० वा. चे दरम्यान घेण्यात आली. सदर परीक्षेसाठी एकुण २१७० उमेदवार पात्र होते. त्यापैकी १६७३ उमेदवार परीक्षेसाठी हजर राहिले व ४९७ उमेदवार गैरहजर होते. लेखी परीक्षेची नमुना उत्तर पत्रिका व गुणपत्रक पोलीस मुख्यालय, आडगाव येथे लावण्यात आलेले आहे. तसेच नमुना उत्तर पत्रिका व लेखी परिक्षेचे गुणपत्रक www.mahapolice.gov.in व www.mahapolice.mahaonline.gov.in व www.nashikruralpolice.gov.in या संकेत स्थळांवर उमेदवारांच्या माहिती करीता प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

जर कोणत्याही उमेदवाराने उत्तर पत्रिकेतील गुणाबद्दल निकाल जाहीर झाल्यानंतर तक्रार केल्यास व उत्तर पत्रिकेची परत तपासणी करण्याची ४८ तासाच्या आत मागणी केल्यास ती स्विकारण्यात येईल. उत्तर पत्रिका फेरतपासणी साठी रू. २००/- इतके अतिरिक्त शुल्क आकरण्यात येईल. उत्तर पत्रिका फेरतपासणी साठी पोलीस उपअधीक्षक मुख्यालय, नाशिक ग्रामीण यांना प्राधिकृत करण्यात आलेले आहे.

आज रोजी आडगाव पोलीस मुख्यालयाचे कवायत मैदानावर झालेल्या लेखी परिक्षेदरम्यान कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता, लेखी परिक्षेसाठी प्रत्येक ब्लॉक निहाय सी.सी.टी.व्ही. कॅमेराव्दारे चोख नियंत्रण ठेवण्यात आलेले होते. दरम्यान लेखी परिक्षेचे हजरेपट तपासणीवेळी एका तोतया उमेदवारास पोलीसांच्या सतर्कतेने ताब्यात घेण्यात आले. पोलीस भरती लेखी परिक्षेसाठी पात्र **उमेदवार चेस्ट क्र. ६३१३ नामे विरसिंग भागचंद कवाळे**, रा. लासुर स्टेशन, पो.सांगवी, ता.गंगापुर, जि.औरंगाबाद याने त्याचे जागेवर एका तोतया उमेदवारास पाठवुन प्रशासनाची फसवणुक केली आहे. पोलीस भरती बंदोबस्ता दरम्यान ब्लॉक नंबर १५ चे इन्चार्ज ऑफिसर उपविभागीय अधिकारी श्री. अतुल झेंडे व त्यांचे अधिपत्याखाली नेमण्यात आलेले अधिकारी व कर्मचारी यांनी उमेदवारांचे हजेरी पटावरील व प्रवेश पत्रावरील फोटोंची पडताळणी केली असता, चेस्ट क्र. ६३१३ चे नावाखाली **तोतया उमेदवार नामे देवसिंग अमरसिंग जारवाल, वय २१**, रा. डावरगाव, ता.बदनापुर, जि.जालना हा मिळुन आल्याने त्यास जागेवरच ताब्यात घेण्यात आले. ताब्यात घेतलेला तोतया उमेदवार हा विरसिंग कवाळे याचे नावावर बनावट प्रवेशपत्र तयार करून लेखी परिक्षेस बसला होता. तसेच त्याची अंगझडती घेतली असता त्याचे स्पोर्टपॅण्टचे आतमधुन एक सॅमसंग कपनीचा मोबाईल चिटकाविलेला मिळुन आला, व पॅण्टचे समोरील बाजुस एक छोटेसे छिद्र पाडुन त्यातुन प्रश्नपत्रिकेचे फोटो काढुन लेखी परिक्षा देतांना सदर तोतया उमेदवार मिळुन आला आहे. सदर भरतीप्रक्रीये दरम्यान कोणताही अनुचित प्रकार करू नये अशा सुचना दिल्यानंतरही, सदर तोतया उमेदवार नामे देवसिंग जारवाल याने मुळ उमेदवार विरसिंग कवाळे याच्या नावाची बनावट सही हजेरी पटावर व उत्तरपत्रिकेवर केली, तसेच बनावट प्रवेशपत्र तयार करून दोघांनी संगनमत करून मुळ उमेदवाराच्या जागेवर दुसरा उमेदवार बसवुन शासनाची लबाडीच्या इराद्याने फसवणुक व अप्रामाणिकपणे बनावट सही करून खोटा दस्तऐवज तयार केला व शासनाची फसवणुक करण्याच्या उद्देशाने गुन्हेगारी स्वरूपाचा कट करतांना मिळुन आल आहे.

सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री.संजय दराडे सा़ो**. व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सा़ो** यांनी तात्काळ दखल घेवुन केलेले मार्गदशन व सुचनांप्रमाणे पोलीस उपनिरीक्षक श्री. अजय कवडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार वरील दोघा इसमांविरूध्द **नाशिक शहर, आडगाव पोलीस ठाणे I गुन्हा रजि.नं. ९५/२०१८ भादवि कलम ४१९, ४२०, ४६५, ४६८, १२०(ब) सह महाराष्ट्र विद्यापिठ बोर्ड आणि इतर परिक्षांमध्ये होणारे गैरव्यवहार प्रतिबंध कायदा १९८२ कलम ७** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास आडगाव पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी करीत आहे.